सातारा, शनिवार, १३ जुलै २०१९

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# शैक्षणिक शुल्क आकारणी धोरणानुसारच

## डॉ. विजयसिंह सावंत; डी. पी. भोसले कॉलेजमधील विद्यार्थी संघासमवेत बैठक

**कोरेगाव, ता. १२ :** शासनाच्या ध्येय धोरणानुसार व शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये शैक्षणिक शुल्काची आकारणी करून प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे महाविद्यालयाकडून जादा शुल्क आकारण्याचा प्रश्नच येत नसल्याचे माजी विद्यार्थी संघ व ग्रामस्थांच्या बैठकीत स्पष्ट केले असल्याचे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी सांगितले.

शिवसेनेचे शहराध्यक्ष अक्षय बर्गे यांनी शैक्षणिक शुल्कासंदर्भात प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर झालेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. सावंत यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. त्यात म्हटले आहे, की महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघ व ग्रामस्थांची नुकतीच बैठक झाली. बैठकीस माजी विद्यार्थी दीपक देवरे, सी. आर. बर्गे, तात्यासाहेब डेरे, प्रभाकर बर्गे, अंकुश पवार, राजेश बर्गे, अमर बर्गे, सागर बर्गे, दिनेश बर्गे, अक्षय बर्गे, हेमंत जाधव, संतोष जगताप, प्रा. सी. बी. जावळे, प्रा. बी. डी. भोसले, प्रा. एस. एन. कोळेकर, प्रा. एस. एन. शिंदे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. नव्याने सुरू केलेल्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विनाअनुदानित, स्वयंअर्थसहायित तुकड्या, विषय, अभ्यासक्रमासाठीचे शासकीय शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्कॉलरशिप, केंद्र शासनाची शिष्यवृत्ती योजना, विविध कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकासात्मक कोर्सेसची माहिती या बैठकीत सर्वांना दिली.

महाविद्यालयाला नॅक पुनर्मूल्यांकन 'ए' ग्रेड (सीजीपीए ३.१२) व 'आयएसओ-९००१:२०१५'चे मानांकनही मिळाले आहे. शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत अन्य महाविद्यालयांच्या तुलनेत या महाविद्यालयाने एक अग्रगण्य महाविद्यालय म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली असून, महाविद्यालयाचे प्रशासन शिस्तीसंदर्भात अतिशय दक्ष आहे. महाविद्यालयामध्ये सुसज्ज ग्रंथालय, मुलामुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका, तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक, सर्व सुविधांनी युक्त क्रीडा संकुल, भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, विधार्थिनींसाठी वसतिगृह, तसेच प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून विविध ठिकाणी नोकरीच्या संधी, अशा सोयी-सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. महाविद्यालयाच्या बदललेल्या शैक्षणिक, भौतिक विकासाची दखल घेऊन ग्रामस्थांनी या बैठकीत महाविद्यालयाचा गौरव करून अभिनंदन केल्याचे पत्रकात नमूद केले आहे.